# योग्य चौकशी. २

( कु. नीना नीनेत् ( नटी ) कडून कु. सोलांज् डार्क् यांस उत्तर.* )

माझ्यासारख्या गरीब गायिकेला आपणासारख्या उच्च कुळांतील कुमारिकेनें पत्र लिहिलेलें पाहून आश्चर्य वाटेल अशी आपली कल्पना झाली ती चुकीची नाहीं. उच्च दर्जाच्या स्त्रियांचीं मला पत्रें येत नाहींत असें नाहीं, व कांहीं सरदार घराण्यांतील स्त्रियांचीं पत्रेंही माझ्या संग्रहीं आहेत. परंतु वाग्दत्त वधूनें आपल्या भावी पतीबद्दल मला माहिती विचारण्याचा हा पहिलाच प्रसंग. क्षणभर असाहि विचार माझ्या मनांत आला कीं तुम्ही आणि आपला राऊल, दोघांनीं मिळून मला घोटाळ्यांत पाडण्याचा किंवा माझी परीक्षा पाहण्याचा बेत केलेला असावा. खात्री करून घेण्याकरतां तुम्हीं त्याला लिहिलेल्या पत्रांपैकीं एक मीं पहायला मागितलें, तों तें अक्षर या पत्राशीं जुळलें ( तुम्हीच पहा, तो माझ्या गोष्टी तुमच्याजवळ बोलतो, तशाच तुमच्या माझ्याजवळ बोलतो ). शिवाय कांहीं खुबीचे प्रश्न टाकतांच असें दिसून आलें कीं तुम्हीं मला लिहिलेल्या पत्राबद्दल त्याला कांहीं माहित नाहीं.

मग तर मी अधिकच घोटाळ्यांत पडलें. तुम्हांला माहिती देण्याचा मला हक्क पोंचतो काय ? त्याचा डाक्तर, वकील व धर्मोपदेशक यांनीं जो धंद्याच्या दृष्टीनें शहाणपणा दाखवला, त्याचेंच अनुकरण मला करावयास नको काय ? राऊलशीं माझा संबंध वरील तीन लोकांइतका जरी शास्त्रोक्त नसला तरी त्याहीपेक्षां अधिक खाजगी व अधिक विश्वासाचा नव्हे काय ?

शेवटीं एकाच विचारामुळें मी तुम्हांला उत्तर देण्याचें ठरवलें: राऊलबद्दल मला वाईट असें कांहीं सांगावयाचेंच नाहीं. ज्या तीन मुद्यांबद्दल तुम्हांला भीति वाटते, त्या तिन्ही मुद्यांवर मला त्याला उत्तम सर्टिफिकिटेंच देणें न्याय्य होईल.

---

* पत्र मागील अंकीं ( मार्सेल प्रेव्हो यांचे फ्रेंचवरून. )

माझ्या बाबतींत त्याचें औदार्य उधळेपणापर्यंत: पोंचत असे; माझ्या बाबतींत त्यानें कधींही मत्सर दाखवला नाहीं; व प्रेमी या दृष्टीनें तो जोमदार व कुशल होता. आपणास माहिती इतकीच पाहिजे होती व या दृष्टीनें माझें काम संपलें, व हें पत्र मला येथेंच संपवतां आलें असतें.

परंतु, कां कोण जाणे, तत्त्वदृष्ट्या तुमच्या पत्रांत जी एक मोठी चूक झालेली दिसते, ती तशीच राहूं देणें मला प्रशस्त वाटत नाहीं. या चुकीनें माझें मन द्रवलें, व तुम्ही जरी आपणास नवीन विचारांच्या म्हणवतां तरी तुम्हांला जगाचा अनुभव नाहीं हें या चुकीवरून दिसतें.

ती चूक अशी. एखादा मनुष्य आपल्या रखेलीशीं उदार, निर्मत्सरी व उत्कटप्रेमी दिसून आल्यास आपल्या स्त्रीशींही तो तसाच वागेल अशी तुमची कल्पना दिसते.

परंतु वस्तुस्थिति बहुतांशीं याचे उलट असते. मी असें म्हणतें तें स्त्रीजातिसहज अहंकारामुळें नव्हे. आपण मजपेक्षां सुंदर, पुष्कळच अधिक सुंदर आहांत, याबद्दल माझी खात्री आहे; कारण आपण म्हणतां तसें बागेंत, नाटकगृहांत, शर्यतींशीं मीं आपणास केवळ ओझरतेंच पाहिलें असें नाहीं; मीं आपणास चांगलें निरखून पहिलें आहे. राऊल्नें मला आपला बेत सांगितला होता, व तरीही मला आपल्या चेहऱ्याबद्दल जिज्ञासा न झाल्यास मी स्त्री कशी ? मीं राऊलचें अभिनंदन केलें, कारण तुम्ही आहांतच तशा सुंदर; आणि आपणा दोघींना जर शेजारीं शेजारीं उभें केलें, तर मी फार झालें तर आपली दासी शोभेन. यांत आणखी आपल्या शिक्षणाची, चाणाक्षपणाची व—जो गुण मी कधींच गमावून बसलें आहे त्या— कौमार्याची भर घातल्यास, आपला सामना बरोबरीचा होणार नाहीं हें उघड आहे.

तरी सुद्धां जो राऊल माझ्याशीं दोन वर्षेपर्यंत प्रेमाच्या कसास उतरला, त्याचे बहुतेक सद्गुण आपल्याशीं संबंध आल्यावर नाहींसे होतील कीं काय अशी मला भीति वाटते.

उदाहरणार्थ त्याचें औदार्य घ्या. मला कसलीही लहर आली कीं राऊलला कितीही खर्च आला तरी तो ती पूर्ण करण्यास आढेवेढे घेत नसे. पण याचा अर्थ

इतकाच कीं उच्च दर्जाच्या मनुष्यानें कमी दर्जाचें प्रेमपात्र ठेवतांना त्यांचा संबंध ज्या ध्वनित ठरावाप्रमाणें चालतो त्याचीं कलमें तो पाळी. हा ठराव लिहावयाचा झाल्यास तो पुढील दोन कलमांत लिहितां येईल:—

कलम १: श्री. 'क्ष' हे कु.'ज्ञ'च्या सर्व गरजा व सर्व लहरी पुरविण्याचें कबूल करतात.

कलम २: वरील अटींवर श्री.'क्ष' यांस कु. 'ज्ञ' चे यजमान म्हणवण्याचा हक्क पोंचेल, —म्हणजे या मुदतींत ज्या ज्या पुरुषांशीं कु. 'ज्ञ' ही संबंध ठेवील, त्यांपैकीं 'हिनें मला फसविलें' अशी तक्रार करण्याचा हक्क फक्त त्यांसच राहील.

यावरून हें अगोदरच ठरलेलें आहे कीं ज्या दिवशीं श्री. 'क्ष' हें कु. 'ज्ञ'-ची एखादी लहर पुरविणार नाहींत, त्या दिवशीं त्यांचा संबंध उघडच तुटला, व कु. 'ज्ञ'ला आपली इच्छा पुरविणारा दुसरा कोणी शोधण्याचा हक्क उत्पन्न झाला. तिनें असें करावें हाच व्यवहार आहे व ती 'क्ष'लाच चिकटून राहिल्यास तिला अधिक चांगला कोणी मिळाला नाहीं असाच त्याचा अर्थ. इतक्या थरावर गोष्ट नेल्याशिवायही त्याला वठणीवर आणण्याचे अनेक मार्ग आहेत, उदाहरणार्थ तो शरण येईपर्यंत त्याला हातभर दूर ठेवणें.

आतां तुम्ही म्हणाल कीं लग्नाच्या बायकोलाही असेंच करतां येईल. पण ही तुमची चूक आहे. पतीला कायद्याचा पाठिंबा असतो, तो अशा यजमानांना नसतो. पतीला हुकूम सोडतां येतो. ज्या घडीला त्याची लहर लागेल त्या घडीला त्याला समागमाचा हक्क आहे. ती जर त्याला म्हणूं लागली कीं परवां पाहिलेलीं कुडीं जर तुम्हीं मला दिलीं नाहींत तर मी रात्रीं 'तीन फुल्या' नांवाच्या तुमच्या मित्राकडे निजायला जाईन, तर तीं कुडीं दुकानांतच राहूं देऊन बायकोला कोंडून ठेवण्याचा हक्क त्याला पोंचतो.

अशा प्रकारचा कायदा जर आह्मा नटींना लागू असता तर आम्हांला गाडी-घोडा, बंगला, दागिने व किंमती कपडे बिलकूल मिळाले नसते, ही तुमची खात्री असूं द्या. पण असा कायदा नसल्यामुळें एकतर आमचें म्हणणें पुरुषांना कबूल करावें लागतें किंवा आमची आशा सोडावी लागते.

आणि म्हणूनच, लग्न होऊन कायद्याचा पाठिंबा मिळाल्याबरोबर पुरुष याचा वचपा काढतात. पत्नीनें मागितलेला दागिना तिला दिला नाहीं कीं रखेल्यांना पूर्वी दिलेल्यांपैकीं एक परत मिळाला असेंच त्यांस वाटतें.

ज्या मत्सराची तुम्हांस भीति वाटते त्यासंबंधींही तुमच्या माझ्यांत असाच फरक होणार. नाटकी स्त्रीचा यजमान मत्सरी नसला तर त्यावरून त्याला अक्कल आहे इतकेंच सिद्ध होतें. उदाहरणार्थ माझीच गोष्ट घ्या. राऊलच्या पसंतीचा मान जेव्हां मला मिळाला, त्यापूर्वी माझे पांच यजमान झाले होते. शिवाय नाटकाच्या धंद्यात नवशिक्या स्त्रीला वेगवेगळया लोकांची मनधरणीही याच मार्गानें करावी लागते. उदाहरणार्थ कंपनीचे मालक, भागीदार, पत्रकार, नाटककार, आणि तुम्हांला माहीतच आहे कीं नाटकें कधींकधीं दोन चार लोकांनीं मिळून लिहिलेलीं असतात ! शिवाय राऊलच्या मनांत मला दोन वर्षांचे वर ठेवायचेंच नव्हतें कारण तेव्हांपासूनच त्याचा लग्नाचा विचार होता.

तेव्हां माझ्या दोन वर्षांपुरत्या इमानीपणाला तो कितीसें महत्त्व देणार ? त्यानें मुळींच दिलें नाहीं हें रास्तच आहे. मात्र त्याचें माझ्यामुळें लोकांत हंसें होऊं नये इतकेंच त्यानें मला सांगितलें, व मींही तशी खबरदारी घेतली.

पण तुमची, त्याच्या पत्नीची, गोष्ट अगदीं वेगळी आहे ! या बाबतींत तुमच्यांत व माझ्यांत बिलकुल साम्य नाहीं ! तुम्ही म्हणजे माझ्यापेक्षां हजारपट किंमतीचा खजिना आहांत, व त्या खजिन्याचा अजून कोणीं उपभोग घेतलेला नाहीं ! राऊलची व तुमची जन्माची गांठ आहे, कमी अधिक मुदतीची भाडेचिठ्ठी नाहीं. त्याची अब्रू, त्याच्या मुलाचा औरसपणा व आमच्या संबंधांत न येणाऱ्या अशा कितीतरी महत्त्वाच्या गोष्टी, या सर्व बाबतींत त्याची तुमच्यावर भिस्त आहे ! व रखेलीच्या इमानाचें महत्त्व बिलकूल नाहीं हें त्याला कळत असल्यामुळेंच तो तुमच्या पातिव्रत्याला अधिक किंमत देणार. व ज्यांना व्यभिचाराची संधि मिळाली नाहीं त्याच स्त्रिया पतिव्रता राहतात, असा त्याचा अनुभव असल्यामुळें तो कदाचित् तुम्हांला फारशी मोकळीक देणार नाहीं. तुम्ही आपला विचार पहा !

राहिला तुमचा तिसरा मुद्दा. पण मला वाटतें याच मुद्याची तुम्हांला सर्वांत

जास्त काळजी वाटते. पत्नीचें ' समाधान ' करणारा पति म्हणजे काय हें तुम्हांस नीटसें माहीत नाहीं, पण आपला बिनधोक मार्ग म्हणून, समाधान करूं शकेल असाच पति तुम्हांला आवडेल, असें तुमचें म्हणणें.

येथेंही माझें तेंच उत्तर. प्रेमी उत्तम होता, पति कसा निघेल हें मला माहीत नाहीं. किंवा थोडेंबहुत माहीत आहेही, कारण त्याचीं तत्त्वें मला क्वचित् प्रसंगीं ओझरतीं दिसलीं आहेत. सर्व चैनी लोकांप्रमाणें त्यालाही स्त्रियांबद्दल, निदान सौख्यसाधन या दृष्टीनें, तिरस्कार वाटतो. तेव्हां स्वतःची पत्नी अशा तऱ्हेचें सौख्यसाधन न होऊं देण्याचा त्याचा पक्का निश्चय आहे. त्यानें पत्नी सुंदर निवडली ती केवळ स्वतःचा मान राखण्यासाठीं, व त्याचें पति या दृष्टीनें कर्तव्य सुखावह व्हावें म्हणून...मी स्पष्ट सांगत नाहीं; कारण ज्या गोष्टी तुम्हांला माहीत नाहींत त्या शिकवण्याचें माझें काम नाहीं......पण माझी खात्री आहे कीं त्याचें पत्नीशीं वर्तन अत्यंत अदबीचें राहील व तो तिला खुशाल झोंप घेऊं देईल. फार वेळां जागी करील अशी भीतीच नको. सारांश मी किंवा माझ्या आधीं आणखी पुष्कळ जशीं त्याचीं प्रेमपात्रें झालीं, तसें पत्नीनें होणें त्याला पसंत नाहीं.

माझें काम संपलें, व मला वाटतें आतां तुम्हांला पुरेशी माहिती मिळाली. मला वाटतें वरील पत्र वाचून आपणास थोडें वाईट वाटलें असेल, मनाची थोडी चलविचल झाली असेल, माझ्यावर आपण दुष्टपणाचाही आरोप केला असेल. कारण राऊलसंबंधीं तुमच्या मनोराज्याला मी दुजोरा द्यावा अशी तुमची अपेक्षा असेल.

मला दोष देऊं नका, मीं सरळपणानें सर्व सांगितलें; माझ्या सरळपणानें आपणांस वाईट वाटलें तर तो माझा दोष का ? एक मोठें तत्त्व मीं आपल्या निदर्शनास आणलें. एकच मनुष्य पत्नीचा पति या दृष्टीनें वेगळा व रखेलीचा यजमान या दृष्टीनें वेगळा असतो. म्हणजे राऊलशीं विवाह करूं नका असें मीं सांगतें काय ? नाहीं. तुम्ही शक्य तितक्या लवकर सरदारीण पॅस्किए व्हा. तो कसाही असला तरी यापेक्षां उत्तम पति सांपडणें कठिण.

असें पहा, कीं पति जसा असावा असें तुम्हांला वाटतें तसा पति सांपडणारच नाहीं. सर्व तरुणींची अशीच अपेक्षा असते, परंतु कोणालाही तो मिळत नाहीं. असें कां हें तुम्हांला माहित आहे ? कारण असा पतीच नसतो. तसा पति म्हणजे पतीच नसतो, तो प्रणयी असतो.

---

# कामवासनेचें मूळ.

——:०:——

कामवासनेची उत्पत्ति कशी होते यासंबंधीं विशिष्ट माहिती नसल्यामुळें, ती नैसर्गिक प्रवृत्ति आहे, देहस्वभाव आहे, असें म्हणण्याची रीत असे. परंतु अलीकडे, म्हणजे गेल्या पन्नास पाऊणशें वर्षांत यासंबंधीं विशिष्ट शोध लागलेले आहेत.

शरीरांत कांहीं मांसग्रंथि अशा आहेत कीं त्यांत वेगवेगळ्या प्रकारचे द्रव उत्पन्न होऊन, ते विशिष्ट मार्गानें त्या पेशींतून बाहेर न पडतां रक्ताशीं मिश्र होतात, व त्यांचे प्रकृतीवर अत्यंत महत्त्वाचे परिणाम होतात. यांपैकीं कांहीं पेशींत दोन प्रकारचे पदार्थ उत्पन्न होतात; एक रक्ताशीं मिश्र होणारा अंतःस्राव व दुसरा विशिष्ट मार्गानें बाहेर पडणारा बहिःस्राव. पुरुषाचें अंडयुग्म व स्त्रियांचे बीजकोश या अशा प्रकारच्या ग्रंथि आहेत. पुंबीज व स्त्रीबीज हे यांचे बहिःस्राव. पण यांशिवाय यांचे अंतःस्राव रक्ताशीं मिसळतात व त्यामुळें कामवासना उत्पन्न होते व शरीरास पुरुषी किंवा बायकी स्वरूप प्राप्त होतें. पुरुषांच्या दाढीमिशा व स्त्रियांचे स्तन, नितंब वगैरेंची विशिष्ट वाढ या अंतःस्रावावर अवलंबून असते इतकेंच नव्हे तर पुरुषी किंवा बायकी स्वभाव सुद्धां यामुळेंच बनतो.

याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे कोंबड्यावर करून पाहिलेल्या प्रयोगांत सांपडतें. कोंबड्यास खच्ची केला असतां त्याचा तुरा वगैरे हळूहळू नाहींसा होऊन त्याला कोंबडीसारखें स्वरूप येतें इतकेंच नव्हे तर त्याचा भांडखोर स्वभावही

नाहींसा होतो. एरवीं दोन कोंबडे पिंजऱ्यांत कोंडून ठेवले असतां, कोंबडी जवळ नसतांही, एकमेकांशीं मरेपर्यंत लढतात.

या विशिष्ठ ज्ञानावरून आतां असें म्हणावें लागतें कीं स्वभाव हा रासायनिक आहे, व हें रसायन अंत:स्रावेशींत तयार होतें. अशा अंत:स्रावपेशी शरीरांत बऱ्याच आहेत, व यांपैकीं एकीचें काम बरोबर चाललें नाहीं तर त्याचा इतर पेशींवरही परिणाम होऊन सर्वच यंत्र बिघडतें. या पेशींनीं बनलेल्या देह-स्वभावाचें महत्व विसरून किंवा माहीतच नसून केवळ नीतीवर व्याख्यानें देत सुटणें हा मूर्खपणा आहे.मन हें शरीराहून वेगळें नसून शरीराच्याच गुणधर्मांचा परिणाम आहे. हें लक्षांत ठेवलें पाहिजे. पेशींच्या स्रावामुळें कामवासना प्रबल झाल्यावर त्या मनुष्यास शांत होण्याचा उपदेश करणें म्हणजे ताप आलेल्यास ' थंड हो ' म्हणून सांगण्यासारखें आहे.

मनोनिग्रहाचा उपदेश करणारांची एक मोठी चूक होत असते ती ही कीं शरीरांत राहणारा आत्मा म्हणून कोणी असतो व तो शरीरावर व मनावरही ताबा चालवूं शकतो, असें तें मानतात. वस्तुत: आत्मा हा प्राणी ईश्वराइतकाच काल्पनिक आहे व यामुळें व्यावहारिक दृष्टया त्याचा बिलकूल उपयोग होत नाहीं. कोणतीही शारीरिक गोष्ट करण्याची इच्छा उत्पन्न झाल्यावर ती कितीही प्रबल असली तरी ती दडपून टाकण्याची शक्ति आत्म्याचे अंगीं आहे ही कल्पना फोल आहे. आत्म्याला अस्तित्वच नसल्यामुळें ती गोष्ट करणें न करणें हें मनालाच ठरवावें लागतें, व ती इच्छा जितकी अधिक प्रबल होईल तितकी मनाची विचारशक्ति कमी होते. मनाची शक्ति कांहीं अंशीं आनुवंशिक, व कांहीं अंशीं पूर्वींचा अनुभव व पूर्वीं मनांत आलेले सर्व विचार यांवर अवलंबून असते. परंतु शारीरिक इच्छा प्रबल झाल्यास त्या इच्छेचा विषय तेवढाच डोळ्यांसमोर दिसूं लागतो व इतर सर्व गोष्टींचें विस्मरण पडतें. तेव्हां अमुक परिस्थितींत अमुक मनुष्य अमुक गोष्ट करील कीं नाहीं हें त्याच्या जन्मापूर्वींच्या म्हणजे आनुवंशिक परिस्थितीवर व जन्मानंतर त्या क्षणापर्यंतच्या एकंदर परिस्थितीवर अवलंबून असतें. या दोन्ही परिस्थिति पूर्वींच्या असल्यामुळें त्यांत बदल करणें शक्य नसतें, यामुळें वरील

प्रश्नाचें उत्तरही ठरलेलेंच असतें. विचार करण्याची शक्ति असेल तोंपर्यंत मनुष्य विचार करतोच, परंतु पुष्कळ वेळां अनिष्ट शारीरिक इच्छेचा सुद्धां जय होतो.

कामवासनेच्या बाबतींत दुसऱ्यास दोष देण्याची संवय पुष्कळांस असते. ज्याप्रमाणें कोणीं आपल्यापेक्षां नीटनेटका किंवा किंमती पोषाख केल्यास आपण त्याला पोकळ ऐट म्हणतों व आपल्यापेक्षां कमी केल्यास त्याला गबाळ म्हणतों, त्याचप्रमाणें कोणाची कामवासना आपल्यापेक्षां तीव्र असल्यास त्यास कामासक्त, व कमी असल्यास त्यास नपुंसक म्हणण्याची पुष्कळांची प्रवृत्ति असते. तसेंच ज्यांची कामवासना अत्यंत मंद आहे असे पुष्कळ स्त्रीपुरुष मनोनिग्रहाची निष्कारण घमेंड मारीत असतात. वास्तविक हा शारीरिक दोष आहे, यांत कोणत्याही प्रकारचें भूषण नाहीं, असें वरील विवेचनावरून दिसून येईल.

---

# जर्मनींत नग्नतेचा प्रसार.

एका फ्रेंच लेखकानें जर्मनींतील तीन वेगवेगळ्या प्रकारच्या नग्नताप्रसारक संस्थांचें वर्णन दिलें आहे. 'पैकीं एके ठिकाणीं दाट झाडींत एका तलावाचें कांठीं मि. पॉल झिमरमन् यांनीं कांहीं घरें व झोंपड्या बांधल्या आहेत. घरें राहण्याकरतां व झोंपड्या दिवसा विश्रांतीकरतां. हे गृहस्थ विवाहित असून यांस २२, १८ १६, १४ वयाच्या चार मुली आहेत. आईबाप व चार मुली पूर्ण नग्न राहतात. येथें कधीं कधीं नॉर्वे, डेन्मार्क, स्वीडन्, स्विटझर्लंड, हॉलंड व इंग्लंडमधील लोकही नग्नतेचा फायदा घेण्याकरतां येतात. यांत कांहीं धर्मोपदेशकही असतात, व हे सर्व लोक नग्न होऊन निरनिराळे व्यायामाचे खेळ खेळतात व तलावांत पोहतात. मी येथें राहिलों असतां मला कधींही मर्यादेचें उल्लंघन झालेलें दिसलें नाहीं.

'हांम्बुर्ग व बर्लिन येथें आडोल्फ् कॉख् नांवाच्या मनुष्यानें दोन नग्न व्यायामशाळा काढल्या आहेत. हे गृहस्थ ३० वर्षांचे आहेत, व सरकारी शाळेंत

जर्मनींत नग्नतेचा प्रसार

शिक्षक असतां त्यांनीं आपल्या हाताखालच्या मुलांमुलींस पूर्ण नग्नावस्थेंत व्यायाम करावयास लावल्यामुळें त्यांस काढून टाकलें. परंतु त्यांच्या या दोन संस्था सरकारी परवानगीनें चाललेल्या आहेत व इतर शहारांतही त्यांनीं शाखा काढल्या आहेत. येथें विद्यार्थ्यांची इतकी गर्दी होते कीं जागा पुरत नाहीं. येथें मुलेंमुली दिगंबर होऊन व्यायाम करतात व कृत्रिम सूर्यकिरणांच्या उजेडाचा फायदा घेतात. मुलींसाठीं वेगळी व्यवस्था केलेली नाहीं. काढलेल्या कपड्यांची रास एकाच ठिकाणीं असते त्यामुळें नग्न मुलांमुलींची गर्दी होते तरी, किंवा चारपांच मुलांमुलींचीं स्नानें एकत्र होतात तरीही त्यांची वागणूक नेहमीं आदबीची असते. जर्मनींत हजारों लोक या संस्थांचा फायदा घेत आहेत.

'याशिवाय उच्च वर्गांतील लोकांकरतां एक 'ल्यूना पार्क' नांवाचा बगीचा बर्लिन येथें आहे. येथें पोहण्याकरतां एक कृत्रिम तलाव असून त्यांत ३ फूट उंचीच्या कृत्रिम लाटा येतात. दररोज सायंकाळीं तेथें पोहण्यास लोक येतात. पण ते सर्व चड्ड्या घालतात. परंतु शनिवारीं सकाळीं ही जागा नग्नव्यायाम-संघाच्या लोकांकरतां राखून ठेवतात. मी तेथें गेलों तेव्हां सुमारें १०० माणसें होतीं, व प्रत्येकाची ऐटबाज मोटर बाहेर उभी होती. तेथें कुटुंबेंच्या कुटुंबें, मोठ्या माणसांपासून ७-८ वर्षांच्या मुलांपर्यंत, आलीं होतीं. लहान मुलांस जिज्ञासा लपवण्याची संवय नसते तरी येथेंही गैरदृष्टि किंवा फाजील जिज्ञासा मला बिलकूल दिसली नाहीं. ज्यांना कामुक दृष्टीनें येथें यावेंसें वाटतें किंवा ज्यांस आपल्या शरीरसौंदर्यानें दुसऱ्याचें मन आकर्षण करावयाचें असतें, ते सर्व लोक सायंकाळीं तेथें जातात, व त्यावेळीं चड्डी घातलीच पाहिजे असा नियम आहे.

माझ्या फ्रेंच मित्रांस या गोष्टी चमत्कारिक वाटतील, परंतु मी लिहिलेलें सर्व वर्णन अक्षरशः खरें आहे. फ्रान्समध्यें नग्नतेच्या प्रचारास जे लोक विरुद्ध आहेत त्यांनीं जर्मनींत जाऊन हें सर्व डोळ्यांनीं पहावें, अशी माझी त्यांस शिफारस आहे.'

---

# पत्रव्यवहार

## " पृथक्-शय्या ! "

रा. रा. संपादक " समाजस्वास्थ्य " यांस

स. न. वि. वि. नाजुक व उघडपणें चर्चा करण्यास अप्रशस्त समजल्या जाणाऱ्या सामाजिक विषयांस वाहिलेल्या आपल्या उपयुक्त मासिकांत खालील मजकूर सवडीनुसार प्रसिद्ध कराल अशी आशा आहे.

" संततिनियमना " चीं तत्त्वें मान्य असून सुद्धां पाश्चात्य कृत्रिम उपाय अमलांत आणण्यास पुष्कळांनां कसेसेंच वाटतें. अर्थात् राहतां राहिलेला एकच एक नैसर्गिक उपाय म्हणजे "आत्मसंयमना"चा ! परंतु तो सर्वसाधारण माणसांना किती अशक्य आहे, हें आपण अनेकदां ' संततिनियमन वि. आत्मसंयमन ' वादांत सांगितलें आहेच. त्याचा परिणाम मात्र एवढाच होतो कीं पुष्कळशा आधुनिक, सुशिक्षित, नवपरिणित तरुणांनां इच्छा नसतांना वर्षागणिक संतति होते, व त्यांच्या गोंडस सुंदर बालपत्नींना अकालीं " पोक्तत्व " येतें. उत्पन्नाबरोबर वाढत्या खर्चाचें व्यस्त प्रमाण होत असेल तें वेगळेंच !

अशा परिस्थितींत " पृथक्-शय्या " म्हणजे पतिपत्नींनीं वेगवेगळ्या बिछान्यावर झोंपणें, हा प्रचार क्वचित गौण उपाय म्हणून चांगला होईल असें मला वाटतें. कांहीं महिन्यापूर्वी महात्मा गांधींनी एका अमेरिकन डॉक्टरच्या " पतिपत्नींनीं एका शय्येवर निजावें काय ?" ह्या विषयावर लिहिलेल्या पुस्तकावर अभिप्राय देतानां असें लिहिल्याचें आठवतें कीं, पतिपत्नी एकमेकांजवळ असतां त्यानां संभोगाची वारंवार इच्छा होते; तरी होतां होईल तों त्यांनीं स्वतंत्र झोंपणेंच इष्ट आहे !

आमच्या हिंदु समाजांत तर विवाहानंतर लगेच होणाऱ्या गर्भाधान ( सोहळ्याच्या ) दिवसांपासून पतिपत्नींची एका खोलींत—नव्हे एका बिछान्यावर—

झोंपण्याची चाल आहे. ही रूढी समाजांत इतकी मुरली आहे कीं एखाद्या कुटुंबात मुलाचें लग्न निश्चित झालें कीं "आतां बापूला एक खोली लागेल!" असे उद्गार ऐकूं येतात. भाड्याची जागा शोधतांना सुद्धां हीच विचारसरणी करण्यांत येते. सारांश, मध्यंतरीच्या अडचणी वगळल्या तर गर्भाधान दिवसापासून तो दोघांपैकीं एकाच्या अंतापर्यंत पतिपत्नींची एक शय्या कांहीं सुटत नाहीं.

ह्यावर कित्येक वेळां हल्लींची महर्गता व जागेची टंचाई ही सबब पुढें आणण्यांत येते. परंतु तींत कांहीं हंशील नाहीं. कोणत्याही सबबीपेक्षां फक्त पुरातन रूढीचेंच प्राबल्य फार दिसून येतें. उतार वयांत विवाह केलेला एक वृद्ध पेन्शनर आपल्या जाणत्या मुलाबाळांना जवळ घेवून, तरुण पत्नीसह एका खोलींत एका बिछान्यावर आज तागायत झोंपत असलेला—छे शृंगारसुख भोगत असलेला प्रस्तुत लेखकाच्या पहाण्यांत आहे. सर्व स्त्रियांनीं मिळून एके ठिकाणीं व पुरुषांनीं दुसऱ्या ठिकाणीं असें झोंपलें असतां जागेच्या अडचणीची तक्रार रहात नाहीं.

पृथक्-शय्येच्या आचरणानें इतर कांहीं फायदे दिसून येतात. रोजच्या रोज जवळ झोंपण्यानें अतिपरिचयानें, पतिपत्नींना रतिसुखाचें महत्व व माधुरी तितकिशी वाटत नाहीं. दूसरें असें कीं, भोगासाठीं स्त्रियांना अगोदर "शास्त्रोक्त तयार" करण्यास लागणाऱ्या—कीं ज्या मेरी स्टोप्सच्या मतें अत्यंत अवश्य असतात—चुंबन-आलिंगनादि उत्तेजक क्रीडा आमच्या ह्या रोजच्या जवळ झोंपण्यामुळें केल्या जात असतील किंवा नाहीं ह्याची शंका आहे. मला वाटतें घरांतल्या कुलस्त्रिया टाकून वेश्येकडे जाण्याचें हेंही एक कारण असूं शकेल! पुष्कळ दिवसांनीं किंवा महिन्यांनीं स्वस्त्रीजवळ झोंपलें असतां शृंगारसुखाला कसा बहर येतो ह्याचा अनुभव अनेकांना असेलच. आणखी एक फायदा घरांतल्या लहान मुलांबाळांच्या जात्याच कुतूहल बुद्धीला पतीपत्नींच्या एकत्र झोंपण्यानें जे वेडेवाकडे फांटे फुटतात त्यालाही आळा बसेल! असो.

पृथक्-शय्या संततिनियमनाच्या बाबतींत जरी फारशी उपयुक्त न वाटली

तरी सुप्रजाजननशास्त्राच्या दृष्टीनें, आरोग्याच्या दृष्टीनें पुष्कळ फायदेशीर आहे. स्वामी शिवानंद ह्यांनी आपल्या "मनोवांछित संतति" ह्या बहुमोल ग्रंथांत देखील सदर्हु तत्त्वाचा अवलंब करण्यास उपदेश केला आहे. प्रस्तुत "पृथक् शय्या" तत्त्वावर आपणही आपलें अधिकारी मत जरूर द्यावें. ही विनंति. कळावें.

विलें पारलें
६-९-२९

आपला
**सु. य. जोशी.**

[ आत्मसंयमन हा उपाय नैसर्गिक आहे, हें विधान चुकीचें आहे. भूक लागली असतां उपास करणें, झोंप येत असतां प्रयत्नानें जागें राहणें किंवा आत्मसंयमनानें कामवासना दडपून टाकण्याचा यत्न करणें, यांस नैसर्गिक कसें म्हणतां येईल ? हीं कांहीं प्रसंगीं इष्ट असतील, तीं नैसर्गिक मात्र नव्हत.

शक्य असल्यास पतिपत्नींच्या निजावयाच्या खोल्या किंवा निदान बिछाने तरी वेगळे असावे हें मत आम्हांस मान्य आहे. परंतु सान्निध्यानें कामवासना जास्त होते या म्हणण्यांत वाटतें तितकें तथ्य नाहीं, कारण प्रथमारंभीं जरी तसें झालें तरी कालांतरानें सान्निध्यामुळें एकमेकांचा कंटाळा येण्याचाच संभव जास्त. परंतु स्वच्छ हवेच्या दृष्टीनें पृथक्-शय्या आम्हांस पसंत आहे. संततिनियमनास याचा बिलकूल उपयोग नाहीं. वेगळ्या खोल्या श्रीमंतांसच शक्य असतात, इतरांस नसतात. मुलांच्या कुतूहलासंबंधीं पाहूं गेल्यास पतिपत्नींनीं दररोज इतरांमध्यें निजून मध्येंच एखाद्या दिवशीं एका खोलींत निजल्यासच चमत्कारिक वाटण्याचा संभव आहे. स्वामी शिव्यानंदांच्या मताचा विचार करण्याचें कारण दिसत नाहीं—सं.]

२. २४।९।२९

सा. न. वि. वि.

बर्नार मॅकफेडन हे एक सुप्रसिद्ध अमेरिकन गृहस्थ असून त्यांचें 'फिझिकल कल्चर' हें मासिकही सर्वप्रसिद्ध आहे. मॅक फेडन हे एक अत्यंत उत्साही, धाडसी, कार्यकनिष्ठ गृहस्थ आहेत यांत संशय नाहीं. त्यांची मतप्रसाराची धडाडी

कौतुकास्पद आणि अनुकरणीय आहे. हिंदुस्थानांतील सुशिक्षितांत ' फिझिकल कल्चर ' मासिकाचा बराच प्रसार झाला असून, त्यांत प्रतिपादिल्या जाणाऱ्या मतांचा छाप आमचेवरहि पडूं लागला आहे. त्यापासून कांहीं फायदे झाले असले तरी तोटेही होत आहेत. आणि त्यातील प्रमुख तोटा म्हणजे अन्नाच्या बाबतींत होत चाललेली आमची गैरसमजूत होय. अमेरिकन लोक वाजवीपेक्षां जास्त पौष्टिक अन्न खात असून मेद फाजलि उत्पन्न करतात. म्हणून मॅकफेडन यानीं त्याविरुद्ध मोहीम काढून मिताहार—किंबहुना अल्पाहार, उपवास यांवर प्रतिक्रियारूप जास्त भर दिला. हिंदी वाचकानीं त्यांचा हेतु व अर्थ लक्ष्यांत न घेतां, तोच उपदेश शब्दशः अंमलांत आणण्यास सुरुवात केली. मॅकफेडन यानीं उपवासाचा व अल्पाहाराचा उपदेश केला तरी मनुष्यातील सत्व व कार्यक्षमता कमी होऊं नये, यावरही त्यांचा कटाक्ष आहे. म्हणून चरबीची फाजील वाढ न करणारे असे पौष्टिक पदार्थ ते सुचवितात. त्यातील कांहीं आमचेकडे मिळत नाहीत; व बाकीच्याबद्दल आम्ही चौकशी करीत नाहीं. मिळून आमच्यांतील बरीच मंडळी मॅकफेडनच्या उपदेशामुळें शरीराची कमजास्त उपासमार मात्र करण्यास शिकली. सुशिक्षित ब्राह्मण वर्गाचें अन्न तरी बऱ्याच अंशीं निसत्व आहे. वास्तविक आम्हांस आहाराच्या बाबतींत सर्वांपेक्षां जास्त सुधारणा करणें अवश्य आहे. पण ती करण्याचा मार्ग म्हणजे आहे तें सोडून उपासमार करावयाची हा नसून, योग्य पदार्थ आम्हीं आहारांत घेतले पाहिजेत हा होय. आधींच फाजील कृश असलेलें शरीर जास्त अशक्त करण्याचा वेडेपणा हल्लीं बरेच लोक करीत आहेत. मॅकफेडन यांच्या उपदेशाच्या इतर अंगांकडे म्हणजे व्यायाम, मोकळी हवा, सूर्यस्नान—यांतही योग्य काळजी घेतली पाहिजे —इकडे त्यांनीं लक्ष अवश्य द्यावें. पण उपवास व अल्पाहार हा सर्वांस लागूं असलेला नियम नाहीं, येवढें लक्षांत ठेवून शरीराची चांगली जोपासना करावी, अशी त्यांस विनंति करतो.

सी. वि. केळकर.

[ सकस अन्न खाणें म्हणजे तूप मुबलक खाणें अशी पुष्कळांची कल्पना असते, ती मात्र खोटी आहे. कांहीं चरबी अन्नांत असणें जरूर आहे, परंतु

विशिष्ट मर्यादेपलीकडे तिचा उपयोग नसून मेद वाढण्याचा संभव असतो. पचनाच्या व व्हिटॅमीन्स ( जीवनतत्त्वां ) च्या दृष्टीनें तुपापेक्षां लोणी बरें व चरबीचा हिशोब करतांना त्यांत तेलही धरलें पाहिजे. धान्य, कंदमुळें, मांस, पालेभाज्या दूध व दुधाचे पदार्थ व अंडीं यांच्या योग्य प्रमाणांत मिश्रणालाच उत्तम आहार म्हणतां येईल. मॅकफॅडन यांच्या नजरेखालीं त्यांच्या उपदेशाप्रमाणें उपास करून एक सुदृढ मनुष्य प्राणास मुकला, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.—सं. ]

३

१९-९-२९

[ 'एक जिज्ञासू' या सहीचें एक निनांवी पत्र लिहून एक गृहस्थ कांहीं प्रश्न विचारतात. वर्गणीदारांशिवाय इतरांस येथें उत्तरें मिळणार नाहींत —सं- ]

× × ×

४

१८-९-२९

सा. न. वि. वि. सप्टेंबर १९२९ चा अंक पोंचला. पान ७२ वर दिलेलें बेकार लोकांचें त्या त्या देशांतील लोकसंख्येबरोबर काय प्रमाण पडतें तें दिलें असतें तर आपला मुद्दा अधिक स्पष्ट झाला असता. त्याचप्रमाणें हिंदुस्थानासंबंधीं सदर माहितीचे आंकडे तुलनेकरतां दिले असते तर बरें झालें असतें. हिंदुस्थानाप्रमाणें मुख्यतः शेतकीवर उपजीविका करणारे एखादे देशांत संततिनियमनाचे उपाय वापरून काय परिणाम झाला आहे अगर होईल ?

पान ६९ वर पत्रव्यवहारांत नमूद केलेलें 'असिधाराव्रत' म्हणजे काय, असें एका बाईनीं आपणास विचारण्यास सांगितलें आहे. ह्या बाई पौर्वात्य पुरातन संस्कृतीच्या चाहत्या आहेत. त्यामुळें उपोषणें, व्रतें, नेम वगैरे संबंधीं माहिती मिळविण्याची साहजिक इच्छा आहे. बाई साधारण सुशिक्षित आहेत. करतां सदर व्रत कोणत्या महिन्यांत कसें करणें व त्याचा वसा वगैरे काय तें सविस्तर कळविण्याची मेहेरबानी करावी.

आपला

× × ×

[ फ्रान्सची लोकसंख्या ३९००००००   ; जर्मनीची ६०००००००;

ग्रेटब्रिटनची ३७००००००   ; इटालीची ३७५०००००;

हिंदुस्थानांतील बेकारांचे आंकडे उपलब्ध आहेत असें वाटत नाहीं. वरील देशांत बेकार लोकांस सरकारी मदत मिळत असल्यामुळें तेथील आंकडे सांपडतात.

शेतकीवर उपजीविका करणाऱ्या देशांसच संततिनियमनाचा विशेष उपयोग आहे. लागवडीच्या जमीनीच्या मानानें लोकसंख्या जेथें कमी आहे अशा अमेरिका, ऑस्ट्रेलिआ वगैरे देशांची व जेथें त्या मानानें लोकसंख्या जास्त आहे अशा चीन, जपान वगैरेंची तुलना केल्यास असें दिसतें कीं पहिल्या वर्गांतील देशांत लागवड करणारांच्या श्रमाच्या व पैशाच्या मानानें माणशीं उत्पन्न जास्त पडतें, म्हणजे धान्य स्वस्त होतें; व दुसऱ्या प्रकारच्या देशांत माणशीं उत्पन्न कमी होतें, म्हणजे त्यांची उपासमार होते. तितक्याच जमीनीवर जास्त श्रम व पैसा खर्च केल्यास त्या मानानें उत्पन्नाचें प्रमाण वाढत नाहीं, व कांहीं मर्यादेपलीकडे तें मुळींच वाढत नाहीं, या सर्वमान्य तत्त्वाचेंच हें उदाहरण आहे. लोकसंख्या कमी झाल्यास शेतकीचा फायदाच आहे.

आपटे यांच्या संस्कृत-इंग्रजी कोशांत असिधाराव्रताच्या दोन व्याख्या दिल्या आहेत:—

यत्रैक शयनस्थापि प्रमदा नोपभुज्यते ॥
असिधाराव्रतं नाम वदंति मुनिपुंगवाः ॥ १ ॥
किंवा, युवा युवत्या सार्धं यत् मुग्धभर्तृवदाचरेत् ॥
अंतर्निवृत्तसंगः स्यात् असिधाराव्रतं हि तत् ॥ २ ॥

म्हणजे (१) एका शयनावर असलेलीही स्त्री उपभोगिली जात नाहीं (त्याला) मोठे मुनि असिधाराव्रत म्हणतात, किंवा (२) तरुण तरुणीबरोबर अजाण नवऱ्याप्रमाणें आचरण करून संगापासून त्याचें मन दूर होतें, तें असिधाराव्रत.

स्त्रीपुरुषांनीं एका शयनावर मध्यें नंगी तरवार ठेवून निजणें, असा याचा

मूळ अर्थ असावा. वरील दोन्ही व्याख्यांत पुरुषाचे आत्मसंयमनासच महत्व दिलें आहे, तेव्हां या व्रतापासुन बायकांस कांहीं पुण्य लागेल असें दिसत नाहीं! आमचें मत आम्हीं सांगितलेंच आहे.—सं. ]

× × ×

५

( भाषांतर ) २४–९–२९

आपण सप्टेंबरच्या अंकांत माझें पत्र ( पत्र ४ ) प्रसिद्ध केलें आहे, तरी त्यासंबंधीं आणखी कांहीं लिहिणें जरूर आहे. एका डॉक्टर मित्रानें माझें इंद्रिय पाहिल्यावर तो मोठ्यानें हंसला, व मला जे वामखोळ वाटत होते ते वामखोळ नसून ते उंचवटे नैसर्गिकच असतात असें सांगितलें. ज्या डॉक्टरानें ते कापावे असें मत दिलें होतें त्यानें मुळीं ते पाहिलेच नव्हते! माझें अज्ञान लवकरच उघडकीस आलें म्हणून बरें, नाहींतर मला अतिशय मानसिक त्रास झाला असता. इतरांस असा भ्रम होऊं नये म्हणून या पत्राचा सारांश प्रसिद्ध करावा अशी विनंति आहे. आपला

× × ×

× × ×

१३ जानेवारी १९२८ रोजीं कैरा जिल्ह्यांत एक मनुष्य बायकोला घेऊन गांवीं जात असतां वाटेंत पाणी काढण्याकरतां एका विहिरीच्या कांठावर वांकला तों बायकोनें त्याला विहिरींत ढकलला. तो एकदम आंत न पडतां ओरडूं लागल्यामुळें मंडळी जमा होऊन त्याला बाहेर काढला, व त्यानें पोलिसाकडे तक्रार केली. इकडे बायकोनें पळून जाऊन दुसऱ्या मनुष्याशीं लग्न केलें. सवा वर्ष पोलिसास तिचा पत्ता लागला नाहीं. पत्ता लागल्यावर पहिल्या नवऱ्यानें तिला सोडचिठ्ठी देऊन दुसऱ्या नवऱ्याकडून रु. ४०० घेतले. इकडे तिच्यावर खटला होऊन तिला ४ वर्षें सक्त मजुरी व रु. ५० दंड झाला. या बाईचें नांव चंचल (!), व हिचें लग्न १० व्या वर्षीं झालें. नवऱ्याशीं न पटल्यामुळें ती आईबापांकडे पळून जात असे व तो पुनः पुनः तिला पकडून परत आणीत असे. या आग्रहामुळें तो जवळ जवळ मेला, पण नशीबानें बायकोची किंमत रु. ४०० मिळाली.

# नवीन लेखातील विचार

रस्त्यांतून व शहरांतून वेश्यांस हांकून देण्याच्या धर्मबाज लोकांच्या प्रयत्नांचे परिणाम पाहिल्यास, नपुंसकत्व, कामवासनेचा ऱ्हास, मनाचे व मज्जातंतूंचे विकार, कामशांतीचे भलभलते प्रकार, समसंभोग, लहान मुलींस बिघडवणें व अनिष्ट विवाह, असे होतात. ( डॉ. रॉबिन्सन् )

× × × ×

सफरचंदांस तकाकी आणण्याकरतां अमेरिकेंतील एक इटॅलिअन् फळवाला त्यांवर थुंकून नंतर पुसून ठेवीत असे, व त्याला गर्मी असल्यामुळें तीं खाणाऱ्या सर्व इटॅलिअन् मुलींना गर्मी झाली. [ डॉ. डेनी, न्यूयॉर्क ]

× × × ×

लहान मुलींच्या योनिमार्गांत पुष्कळ वेळां परम्याचे जंतु शिरून त्यास सूज वगैरे येऊन पू वाहूं लागतो. हा संसर्ग मोठ्या माणसांशेजारीं निजल्यानें, किंवा त्यांचे टुवाल वगैरे वापरल्यानें लहान मुलींस लागतो. घरांतील इतर माणसांस रोग नसला तरी नोकरांस असण्यास बराच संभव असतो, व ते कपडे वगैरेच्या बाबतींत निष्काळजी असतात, व कधींकधीं संभोगाचा प्रयत्न किंवा नुसती तशा प्रकारची क्रीडाही करीत असतात, यामुळें त्यांस संसर्ग होतो. या जंतूंचा लहान मुलींस विशेष त्रास होतो, याकरतां या संसर्गास विशेष जपलें पाहिजे. अशा लहान मुलींकरतां एक वेगळा दवाखाना न्यूयॉर्क येथें काढला आहे. या रोगाची डॉक्टरही पुष्कळ वेळां हयगय करतात असें तेथें दिसून आलें.

× × × ×

लॉइड जॉर्ज म्हणतात, इंग्लंडांतील बकारी मला कमी करतां येईल, पण सुमारें ५,७०,००० लोक नेहमीं बेकार राहणारच, त्याला इलाज नाहीं. वाहवा लॉइड् जॉर्ज !

बेकारी नाहीं असा एकच मोठा देश आहे व यां दृष्टीनें त्याचें निरीक्षण करणें जरूर आहे. फ्रान्समधील अगदीं अलीकडचे आंकडे घेतल्यास ९००० लोक बेकार आहेत, पण १७००० कामें रिकामीं आहेत. यामुळें कोणालाही फार दिवस बेकार रहावें लागत नाहीं. फ्रान्समध्यें बेकारीमुळें सरकारांतून मदत घेणारे ४०० पासून १००० इतकेच लोक असतात, म्हणजे ४०००० त एका मनुष्यास मदत करावी लागते. इंग्लंडांत ४० त एकास करावी लागते.

फ्रान्समध्यें गेल्या तीन पिढ्या बेकारी नाहीं, कारण लोकसंख्या सावकाश वाढत आहे. इ. स. १८०० मधें इंग्लंडची लोकसंख्या ८०,००,००० होती, फ्रान्सची २,५०,००,००० होती. आज दोन्ही देशांची संख्या सारखीच आहे. यामुळें इंग्लंडमधें अतोनात माल उत्पन्न होऊन तो कोंठ खपणें अशक्य झालें व बेकारी झाली. फ्रान्समधें कोणासही काम मिळतें. जर्मनीची स्थिति इंग्लंडसारखीच आहे. हा संततिनियमनाचा प्रभाव आहे [ न्यू जनरेशन ]. तरी सुद्धां नाशिकचे मागसलेले डॉ. केतकर फ्रान्सचें उदाहरण संततिनियमनाविरुद्ध पुरावा म्हणून पुढें करतातच ! अज्ञानाचें दर्शन लोक कां करतात ? अज्ञानामुळेंच !

× × ×

संततिनियमनाचे शत्रू घटस्फोटाच्याही विरुद्ध असतात. नवऱ्याला वेड लागलें, गर्मी झाली, किंवा तो खून करून काळ्यापाण्यावर गेला तरी स्त्रीची सुटका होत नाहीं. डॉ. हॉलंडर यांनीं एका बाईचें उदाहरण दिलें आहे. ती

२६ वेळां वेड्यांच्या इस्पितळांतून सुटली होती. तिला १३ मुलें झालीं, पैकीं ५ मेलीं व २ वेडीं आहेत. तिच्या दोन बाहिणींना वेड लागलें होतें, पैकीं एक इस्पितळांत गेली, दुसरीनें जीव दिला तिच्या दोन मावशाही वेड्याच होत्या.

* * * *

मिसेस चान्स यांनीं इंग्लंडांतील कामशास्त्राचा विचार करणाऱ्या एका संस्थेपुढें एका व्याख्यानांत सांगितलें कीं स्त्रीपुरुषांची नीती वेगवेगळ्या मापानें मोजतात हें खरें परंतु त्यापैकीं स्त्रियांचें माप श्रेष्ठ असें मात्र नाहीं. उलट तें कमी दर्जाचें आहे कारण तें केवळ नकारात्मक आहे. पुष्कळ स्त्रियांस समागमापासून बिलकूल समाधान न होतां मुलांचे कष्ट मात्र सोसावे लागतात. ही स्थिती बदलली पाहिजे. त्रास जर त्यांना सोसावा लागतो तर नैसर्गिक कामतृप्तीवरही त्यांचा हक्क आहे.

\+ \+ \+ \+

पुढील दोन गोष्टी डॉ. रॉबिनसन् यांनीं प्रसिद्ध केल्या आहेत. [ १ ] ‘ सहा वर्षांपूर्वी मी एका तरुण स्त्रीस उपचार करीत असतां तिनें आपल्या टॉन्सिल्स [ घशांतील गांठी ] पाहण्यास सांगितलें. मी तिला म्हटलें कीं हा माझा विषय नव्हे, परंतु ती एका घशाच्या तज्ज्ञाकडे गेली असतां त्यानें त्या गांठी एकदम कापल्या पाहिजेत व ह्याबद्दल २०० डॉलर [ रु. ५५० ] फी पडेल असें सांगितलें होतें, म्हणून तिला माझें मत पाहिजे होतें. मीं पाहिलें तों मला घसा लाल झालेला दिसला, परंतु गांठी कापण्याची जरूर–निदान तांतडी–दिसली नाहीं, व माझी स्वतःची मुलगी असती तर मी कापूं दिल्या नसत्या असें मीं सांगितलें. उपचार म्हणून एक टॉवेल बर्फाच्या पाण्यांतून पिळून काढून घशाभोंवतीं गुंडा-

ळून वरून एक कोरडा टॅविल गुंडाळून निजावें व सकाळ संध्याकाळ मिठाच्या पाण्यानें गुळण्या कराव्या, व कधींकधीं त्या पाण्यांत किंचित् पोटॅशम् परमॅंगॅनेट टाकावें असें सांगितलें. ती स्त्री नुकतीच मला भेटण्यास आली होती, व तेव्हांपासून तिच्या घशाला बिलकूल त्रास झाला नव्हता. या माझ्या कृतीमुळें एका व्यवसायबंधूचे २०० डॉलर बुडाले याबद्दल मला वाईट वाटतें, पण तो डॉक्टर श्रीमंत असून दरवर्षी युरोपांत जातो, व त्या बाईलाच पैशाची जरूर जास्त होती. ( २ ) एकदां एक विवाहित स्त्री एका डॉक्टराकडे रडत, पायां पडत आली. ती गर्भवती होती व तिला आणखी मुलें नको होतीं. कसें-ही करून यांतून सोडवा अशी तिनें विनवणी केली. तिला दोनच महिने गेले होते तेव्हां डॉक्टरानें गर्भाशयांत एक सळई घातली. **याबद्दल त्यानें एक पैही घेतली नाहीं.** तिचा गर्भपात झाला व कांहीं दिवस थोडाबहुत ताप आला, पण ती लवकरच चांगली बरी झाली. पुढें ती व तिचा नवरा, डॉक्टरावर फिर्याद करण्याची धमकी देऊन, त्याजकडून मोठी रकम मागूं लागलीं. गर्भपात हा गुन्हा असल्यामुळें, कोर्टांत जाण्यापेक्षां रकम भरलेली बरी, असा त्याच्या वकिलानें सल्ला दिल्यावरून त्यानें ५००० डॉलर [ रु. १४००० ] त्या बाईला दिले. त्या बाईच्या रडण्यामुळें त्याला दया आली, त्या बद्दल ही शिक्षा !

× × × +

इरॅस्मस् नांवाचा प्रख्यात डच् तत्त्ववेत्ता १५३६ सालीं मेला. त्याचें थडगें गेल्या वर्षी कांहीं कारणानें उकरावें लागलें. तेव्हां त्याचीं हाडें सांपडलीं, तीं तपासतां त्यास गर्मी होती असें दिसून आलें. त्या सुमारास यूरोपांत गर्मीची सांथच होती व इंग्लंडचा आठवा हेनरी व त्यावेळचा पोप या दोघांसही हा रोग होता. इरॅस्मस्‌ला संसर्गजन्य रोगांची फार भीति वाटत असे. त्यास

हा रोग असावा असें त्याच्या एका पत्रावरूनही दिसतें, व ते ४१० वर्षा-नंतरच्या हाडांच्या तपासणीनें खरें ठरलें. ( लिटररी गाइड्. )

\+ + + +

सुंता केली पाहिजे असें कुराणांत कोठेंही सांगितलेलें नाहीं व महंमद पैगंबराची सुंता केलेली नव्हती, असें अलजिरियांतील एक फ्रेंच लेखक म्हणतो.

× × × ×

# गर्भपात.

स्त्रीपुरुषसंबंधाविषयीं सुधारणा करण्याकरतां जो जगत्संघ निघाला आहे, त्याचे स्वित्झर्लंडमधील प्रतिनिधि डॉ. गॅष्टर यांनीं तेथील गर्भपातासंबंधीं कायदा बदलून पहिले तीन महिनेपर्यंत गर्भपातास डॉक्टरांस परवानगी द्यावी याकरतां खटपट चालवली आहे. ते म्हणतातः—

‘ गेल्या १८ वर्षांत मजकडे १०००० स्त्रियांनीं गर्भपाताची मागणी केली. या स्त्रिया सर्वांत खालच्या वर्गापासून तों अत्यंत उच्च दर्जापर्यंत सर्व वर्गांतल्या होत्या. यांत धर्मोपदेशकांच्या अविवाहित मुली होत्या. असलेल्या मुलांचें संगोपन नीट व्हावें म्हणून आणखी मुलें नको असें वाटून आलेल्या उत्तम माता होत्या. अविवाहित मुली तर अर्थातच पुष्कळ होत्या, बाळंत-पणाचा त्रास नको, किंवा त्यानें आपलें सौंदर्य बिघडूं नये हाही पुष्कळांचा हेतु होता. कांहीं व्यभिचाराचे परिणाम टाळण्याकरतां किंवा इस्टेटीच्या वारशा-संबंधानें आल्या होत्या, त्या सर्व स्त्रियांस गर्भपात हाच बरा मार्ग वाटला.

गर्भपाताचा प्रयत्न स्वतःवर किंवा दुसरीवर केलेल्या सर्व स्त्रियांस तुरुंगांत टाकूं म्हटल्यास फक्त कुमारिका आणि वंध्याच शिल्लक राहतील अशी माझी खात्री आहे.

पण वरच्या प्रतीच्या स्त्रिया कधीं गर्भपाताच्या खटल्यांत सांपडत नाहींत. डॉक्टर, वकील, जज्ज, प्रोफेसर, इंजिनिअर, कौंसिलचे सभासद, यांच्या बायका किंवा मुली गर्भपात करीतच नाहींत असें नाहीं, पण त्याचा बभ्रा न करण्याइतकी त्यांना अक्कल असते. शिवाय या स्त्रिया निरुपयोगी व धोक्याचीं औषधें घेण्यांत वेळ न घालवतां एकदम डॉक्टराकडे जातात. खालच्या वर्गांतील स्त्रियांनीं कांहीं केल्यास त्या सर्वांना सांगत सुटतात.

'गर्भपात डॉक्टरानें योग्य रीतीनें, घाई न करतां केल्यास त्यांत बिलकूल धोका नाहीं. गेल्या १८ वर्षांत तीस डॉक्टर व तितक्याच नर्सो यांच्याशीं माझा उत्तम परिचय झाला आहे, याशिवाय गर्भपात करणारे शंभर एक डॉक्टरीचें ज्ञान नसलेले लोक मला माहीत आहेत, व गर्भपात करविलेल्या विवाहित व अविवाहित स्त्रिया हजारों माहीत आहेत. यासंबंधीं मला १०००० खाजगी पत्रें आलेलीं आहेत, तेव्हां यांतील सर्व गुप्त कप्पे मला माहीत झालेले आहेत. जिनीव्हा शहरांत दररोज ५० गर्भाशय खरडून साफ केले जातात, व हें काम करणारे निदान १०० डॉकटर आहेत. जेथें ५०० माणसांस एक डॉक्टर हें प्रमाण आहे, तेथें डॉक्टरांचें पोट एरव्हीं भरावें कसें ?

याबद्दल वेगवेगळे कायदे अंमलांत होते. इ. स. १२०० मध्यें गर्भधारणेपासून ४० दिवस पर्यंत गर्भपात चालत असे. धर्माची व पोपची सत्ता वाढल्यावर, पंधराव्या शतकांत, गर्भपात करणाऱ्या स्त्रीला व तिच्या साथीदारांना जिवंत पुरीत असत. हल्लीं गर्भपात हा गुन्हा आहे, परंतु गर्भपाताचा

प्रयत्न हा गुन्हा नाहीं. हा कायदा बदलून तीन महिनेपर्यंत गर्भपातास परवानगी दिल्यास हजारों स्त्रियांचे प्राण वांचतील.

———:०:———

प्रसिद्ध अमेरिकन लेखक थिओडोर ड्राइझर रशियासंबंधीं ह्मणतातः—रशियांत घटस्फोट अत्यंत सोपा असतो. कोणीही एकानें घटस्फोट पाहिजे असें कळविलें ह्मणजे झालें. बायकोचें किंवा मुलांचें काय होईल हा प्रश्नही सोपा असतो. बायको काम करून आपलें पोट भरीतच असते. ती आजारी असल्यास ती बरी होईपर्यंत नवरा आपल्या पगारापैकीं एक चतुर्थांश तिला देतो व बाकी मदत सरकारांतून मिळते. मुलें सोळा वर्षांचे आंती असल्यास त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था होते व त्याकरतां आईला व बापालाही पगाराचे मानानें कांहीं पैसे द्यावे लागतात. अर्थात सोळा वर्षांचे पुढें तीं काम करून पैसे मिळवतात. खाजगी मालमत्ताच नसते, तेव्हां वारसाचा प्रश्नच नसतो.

स्वैर संभोगाची परवानगी असल्यामुळें अश्लील पुस्तकें व नाटकें, वेश्यांविरुद्ध खटपटी करणाऱ्या संस्था, बायका पळवणें, स्त्रियांमुळें होणाऱ्या मारामाऱ्या वगैरेचा रशियांत मागमूस नसतो. दोन माणसांचें प्रेम जडल्यास तीं एकत्र राहतात. तें संपेल त्या दिवशीं वेगळीं होतात. त्यांत कायद्याचा, दर्जाचा किंवा धर्माचा संबंध नाहीं. बळजबरी किंवा खून कधीं कधी होतात, परंतु व्यभिचार हा गुन्हा नाहीं. स्त्रीपुरुषसंबंधाविषयीं इतकी सरळ दृष्टि रशियाखेरीज इतर कोठेंही दिसत नाहीं.

कित्येक शहरांत अजून वेश्या आहेत, पण त्या जुन्या अमदानींतल्या असून, काम करण्याची शक्ति किंवा इच्छा नसल्यामुळें त्याच धंद्यास चिकटल्या आहेत.

स्त्रियांस पुरुषांइतकाच पगार मिळतो व कोणताही धंदा त्यांस बंद नाहीं. विवाहित स्त्रियाही काम करतात व घरीं नोकर ठेवतात. जेवणाची व्यवस्था सार्वजनिक असते. या मुळें स्त्रियांची घरकामांतून सुटका होऊन त्यांस स्वातंत्र्य मिळालें आहे. कोणास गर्भपात करावयाचा असल्यास आठ दिवस सरकारी इस्पितळांत फुकट ठेवतात व रजा पगारी असते. तसेंच बाळंतपणाचा सर्व खर्च सरकारी व आठ आठवडे पगारी रजा, अंगावरील मूल पाजण्याकरतां रोज दोन तास सुटी मिळते.

———:०:———

एका फ्रेंच मनुष्याचे बीजकोष जन्मतः सूक्ष्म असून त्यांची वाढ न झाल्यामुळें शारीरिक व मानसिक न्यूनता दिसत असे. १९२८ सालच्या मे महिन्यांत, त्याच्या ४२ व्या वर्षी, डॉ. व्हॉरॉनॉफ यांच्या नवीन पद्धतीप्रमाणें एका वानराचा बीजकोष शस्त्रक्रियेनें त्या मनुष्याच्या वृषणांत बसवला. त्याचे परिणाम एका वर्षांत तीन प्रकारांनीं हितावह झालेः–( १ ) शारीरिक; थकवा नाहींसा होऊन आधिक व पुष्कळ वेळ काम करण्याची शक्ति आली, व पुरषत्वाची गौण चिन्हें ह्मणजे दाढी, मिशा व जननेंद्रियावर केंस दिसूं लागले. ( २ ) कामाविशिष्ट; इंद्रियोत्थापन होऊन रेत स्खलन होऊं लागलें, यावरून बीजकोषाचा उपयोग केवळ प्रजाजनन हा नसून त्याचा परिणाम एकंदर प्रकृतीवर इष्टच होतो हें उघड आहे. + + +